दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२९ मार्च २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २१० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● sunday 29 March 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 210 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## ओळख असणे म्हणजे गुन्ह्यात सहभाग नव्हे

**मुंबई**–भोंदू अशोक खरात प्रकरणात नाव ओढले गेल्याने शिवसेना नेते आणि आमदार दीपक केसरकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. अनेक नेत्यांचे खरातसोबतचे फोटो समोर आले आहेत, मात्र केवळ ओळख असणे म्हणजे संबंधित व्यक्तीच्या कृत्यात सहभागी असणे असा होत नाही, अशा शब्दांत केसरकर यांनी आपले स्पष्टीकरण दिले. या प्रकरणाशी आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न हा केवळ राजकीय द्वेषापोटी केला जात असून, यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आघाडीवर असल्याचा थेट आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.आमदार दीपक केसरकर यांचा नाशिकच्या बहुचर्चित अशोक खरात प्रकरणात संबंध असल्याचा आरोप होत आहे. दीपक केसरकर यांचे अशोक खरात याच्यासोबतचे काही फोटो देखील समोर आले आहेत. दीपक केसरकर शिक्षण मंत्री असताना, त्यांच्या खात्यातील कारभार हा अशोक खरात याच्या सांगण्यावरून होत असल्याचा आरोप ठाकरे गटाने केला होता. आता दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोधकांचा समाचार घेतला आहे.

# कदाचित ३ महिन्यांनी एलपीजी बंद होईल: अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळांचे मोठे विधान

## पीएनजीचा गॅसच्या जोडण्या वाढवण्यावर दिला भर

**राज्यातील विविध शहरांत स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला असताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी कदाचित ३ महिन्यांत एलपीजी गॅस बंद होईल असे पोटात गोळा उठवणारे विधान केले आहे. सध्या पीएनजी गॅस स्वस्त पडत आहे. त्यामुळे त्याचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे. केंद्राच्या एका पत्रकात ३ महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल असा उल्लेख आहे. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणालेत.नवी दिल्लीत आज केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर व केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या नेतृत्वात एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी व पीएनजी गॅसचा अधिक चांगला व सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे, तसेच एका निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. त्यानंतर महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री मंत्री छगन भुजबळ यांनी वरील विधान केले.**



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भुजबळ म्हणाले, देशातील निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? त्यात कोणत्या अडचणी आहेत याचा आढावा घेण्यासाठी आज दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री हरदीप पुरी, प्रल्हाद जोशी व मनोहरलाल खट्टर उपस्थित होते. त्यांनी सर्वच राज्याचे मंत्री व सचिवांना काही सूचना केल्या. त्यानुसार, पीएजी गॅस सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे. त्याचा जास्त प्रसार झाला पाहिजे.केंद्र सरकारच्या एका पत्रकात कदाचित ३ महिन्यांनी एलपीजी बंद होईल असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करून घेतल्या पाहिजेत. ज्या ठिकाणी यासंदर्भात काम करणे शक्य आहे, तिथे ते सुरू केले पाहिजे. सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजे. पाण्याचे व वीजेचे कनेक्शन असल्यावरच इमारतींना ओसी दिली जाते. त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे.आपल्याला पीएनजी जोडण्या लवकरात लवकर करायच्या आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी विविध विभागांना परवानग्या मागितल्या जातात. पीएनजी मिळाली असे समजावे. या परवानग्या २४ तासांत दिल्या जातील. पीएनजी काम करणाऱ्यांना २४ तास परवानगी राहील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. छगन भुजबळांनी यावेळी गॅस टंचाईमुळे केरोसीनचा अधिकाधिक वापर करण्यावरही भर दिला. ते म्हणाले, राज्य सरकारकडे केरोसिन उपलब्ध होते. पण आपण ते देऊ शकत नव्हतो. कारण, उच्च न्यायालयाने त्यावेळी एक आदेश दिला होता. आता आपण न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार, जिथे एलपीजी व पीएनजीचा कमी आहे, तिथे केरोसीनचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. ज्या जुन्या डिलर्सच्या परवान्यांचे नुतनीकरण प्रलंबित होते, त्यांनी ते झाले असे समजून कामाला लागावे. या प्रकरणी पेट्रोल पंपावर केरोसीनचे टँकर उभे करून तेथून पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे भुजबळ म्हणाले.

## खरवंडी कासारमध्ये रामनवमी उत्साहात साजरी रक्तदान व नेत्रतपासणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद





दैनिक वादळ वार्ता

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे श्रीरामनवमीचा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात व सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदान शिबिर व मोफत नेत्रतपासणी शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. उपस्थित भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने पूजा-अर्चा करून श्रीरामांचे दर्शन घेतले. यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सकल हिंदू समाज, खरवंडी परिसर यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत स्वेच्छेने रक्तदान केले. तसेच नेत्रतपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात आली व मोतीबिंदू रुग्णांसाठी पुढील उपचारांची नोंदणी करण्यात आली.

कार्यक्रमात तुळजवाडी संस्थांचे महंत खताळ महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, रामनवमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाला एकजूट, सेवा आणि संस्कार यांचा संदेश देणारा दिवस आहे. युवकांनी संघटित राहून समाजकार्य करत धर्मरक्षणासाठी पुढे यावे. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

या प्रसंगी भगवानगड परिसरातील असंख्य हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध नियोजन करत शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच स्वयंसेवक व वैद्यकीय पथकासाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

याचबरोबर रामनवमी निमित्त गावातून भव्य शोभायात्राही काढण्यात आली. भगव्या पताकांनी सजलेली ही शोभायात्रा वाजतगाजत निघाली असून रामभक्तांनी जयघोष करत वातावरण भक्तिमय केले. सर्वांच्या सहकार्यामुळे धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक उपक्रमाचा आदर्श निर्माण करत खरवंडी कासार गावाने पुन्हा एकदा समाजापुढे प्रेरणादायी उदाहरण ठेवले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## औसा शहरासह तालुक्यात श्री राम जन्मोत्सव उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

चैत्रशुद्ध नवमीचा दिवस हा मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांच्या जयंतीचा उत्सव श्रीराम भक्त अत्यंत हर्ष उल्हास आणि प्रतिवर्षी श्रीराम नवमी म्हणून साजरा करतात औसा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात श्रीराम भक्तांनी श्रीराम जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा केला शहरातील भुईकोट किल्ल्या नजीक असलेल्या श्रीराम मंदिरामध्ये मंदिर समिती व श्रीराम जन्मोत्सव संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता सकाळी दहा वाजल्यापासूनच भजन व श्रीराम जन्माचा पाळणा तसेच दुपारी बारा वाजता गुलाल उधळून श्रीराम जय राम जय जय राम चा जयघोष करीत श्रीराम नवमी चा उत्सव रामभक्त आणि साजरा केला औसा लातूर रस्त्यावर हनुमंत थोरात यांच्या शेतातील मंदिरातही श्रीराम नवमीचा उत्सव साजरा करण्यात आला तालुक्यातील बेलकुंड,जवळगा पोमादेवी,किल्लारी,आलमला,भादा,उजनी,अशिव हा सलगन,नागरसोगा इत्यादी गावातही श्रीराम भक्तांनी या उत्सवात अत्यंत हर्ष उल्हास आणि



सहभाग घेतला गुलाल उधळण झाल्यानंतर रामभक्तांना पावसाळयातील मंदिरामध्ये महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती सायंकाळी सहा वाजता शेकडो महिलांनी दीपोत्सव साजरा केला तसेच श्रीराम जन्मोत्सव सोहळा संयोजन समितीच्या वतीने प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा अवस्था शहरातील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली या शोभायात्रेत रामभक्त आणि श्रीराम जय राम जय जय राम चा जयघोष केल्यामुळे परिसर दुमदुमून गेला होता रात्री नऊ वाजता दक्षिण मुखी वीर हनुमान मंदिर चौकात फटाक्यांची आतिषबाजी व शोभेची दारू उडवून रामभक्तांनी जल्लोष साजरा केला.

## डीजेला ठाम नकार; ढोल ताशांचा गजरात गडचांदूर दणाणला;युवा शक्तीचा जल्लोष

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गडचांदूर येथील वार्ड क्रमांक ४ मध्ये रामनवमी जन्मोत्सव यंदा अत्यंत उत्साहात, जोशात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, नवयुगातील युवा पिढीने डीजे संस्कृतीला ठाम नकार देत ढोल-ताशांच्या दमदार गजरात उत्सव साजरा करून एक वेगळाच आदर्श निर्माण केला.ढोल-ताशांच्या कडकडाटाने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. आक्रमक आणि जोशपूर्ण तालावर युवक-युवती अक्षरशः रंगून गेले होते. या मिरवणुकीत महिला व पुरुष दोघांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत ढोल-ताशे वाजवत आकर्षक मिरवणूक काढली. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे वातावरणात धार्मिकता आणि सांस्कृतिक ऊर्जा निर्माण झाली होती.

या उपक्रमामुळे केवळ सण साजरा झाला नाही, तर समाजात पारंपरिकतेबद्दल जागरूकता आणि एकजूटही दिसून आली. डीजेच्या कर्णकर्कश आवाजापेक्षा ढोल-ताशांचा गजर अधिक प्रभावी



आणि सुसंस्कृत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या यशस्वी आयोजनासाठी श्री रामनवमी उत्सव समिती, वार्ड क्र. ४ गडचांदूर यांनी विशेष पुढाकार घेतला. आयोजन समितीतील कैलाश कंठाळे, शुभम भोंगळे, महादेव बोरकर, राकेश श्रीमंगल, राधेश्याम चुट्टे, आदित्य तिवाडे, रोहित हंसकर, बंट्टी भोंगळे, कृष्णा मुनेश्वर, रवि गिरटकर तसेच वार्डमधील सर्व युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम शांततेत आणि उत्साहात पार पाडला.एकूणच, वार्ड क्रमांक ४ मधील हा रामनवमी उत्सव पारंपरिकता, एकजूट आणि युवा शक्तीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

## सम्राट अशोकांचा खरा इतिहास समाजा पुढे मांडणे काळाची गरज: हरी मेश्राम

दैनिक वादळ वार्ता

**पळसगांव (पि) । प्रतिनिधी**

सम्राट अशोकांचे मूळ पुरुष हे जन्माने बौद्ध होते.त्यामुळे सम्राट अशोक हा जन्मत:च बौद्ध राजा होता,पण इथल्या इतिहासकारांनी खोटी माहिती सांगून कलिंग युद्धा नंतर सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला असं सांगण्यात आलं. परंतु तत्कालीन इतिहासकाराने सम्राट अशोकांना क्रूर राजकर्ता ठरवले.मात्र इंग्रज संशोधकांनी सम्राट अशोक यांच्या शिलालेखांचा अभ्यास करून सम्राट अशोक असे समाजाभिमुख राजे होते,त्यांनी लोक कल्याणाच्या योजना राबवित आपल्या धर्माबरोबर

इतर धर्माचा आपण आदर केला पाहिजे अशी भावना सम्राट अशोक यांची होती.याबाबत इंग्रज संशोधकांनी शिलालेखाच्या माध्यमातून समोर आणले असे प्रतिपादन आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम सर यांनी केले.महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर व समता सैनिक दल तालुका चिमूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती येथे अखंड भारताचे निर्माता सम्राट



अशोक जयंती कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाबोधी महाविहार समन्वय समिती चिमूर तालुकाध्यक्ष विलास राऊत होते तर प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम,सामाजिक कार्यकर्ते डॉ.आशिष पाटील,डॉ.महेश खानेकर सर,आयु. सुरक्षाताई अंबादे धम्मांजली महिला मंडळ अध्यक्ष,तक्षशिला बुद्धविहाराचे अध्यक्ष वतन सहारे, धम्मपाल नरवडे एसबीआय चिमूर शाखा व्यवस्थापक आदी उपस्थित होते. चिमूर शहरांमध्ये दुसऱ्यांदा चक्रवती सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाबाई भीमरावजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांक १००० मार्शल निशा प्रकाशनाथ पाटील,द्वितीय क्रमांक ७००,मार्शल शाश्वत रूपचंद पाटील,तृतीय क्रमांक ५०० मार्शल द्रृष्टी विलास राऊत यांना देण्यात आले.याचबरोबर सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन प्रमाणपत्र वितरण (रोख रक्कम, प्रशस्तीपत्र,शिल्ड,भारत राष्ट्र कॅलेंडर) करण्यात आले. हरी मेश्राम पुढे म्हणाले की ज्या सम्राट अशोकांनी बंगाल पासून अफगाणिस्तान पर्यंत राज्य विस्तार केला त्याच सम्राट अशोकाला आज शासन विसरल्याचे दिसून येत आहे.सम्राट अशोकाच्या राज्यकारभाराच्या अनेक बाबीचा भारत देशाने स्वीकार केला. त्यांनी कोरलेले अशोक चक्र भारत देशांनी आपल्या ध्वजावर स्वीकारले,चार सिंहाची प्रतिमा सारनाथच्या स्तुपावरून सरकारने स्वीकारली.एवढे सारे असताना आज मात्र सम्राट अशोकांना देश विसरला त्यांचे कर्तृत्व देश विसरून गेला,याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला.याप्रसंगी विलास राऊत,डॉ.आशिष पाटील,डॉ.महेश खानेकर, आयुष्यमती सुरक्षा अंबादे, धम्मपाल नरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश मेश्राम यांनी केले तर प्रास्ताविक महेंद्र बारसागडे यांनी केले.आभार प्रियानंद गेडाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धम्मांजली महिला मंडळ,महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर,समता सैनिक दल चिमूर यांनी सहकार्य केले.

# संपादकीय

## आर्थिक समस्येचे सावट

अमेरिकेच्या आर्थिक क्षेत्रातून ज्या बातम्या येत आहेत त्या थोड्याफार प्रमाणात २००८मध्ये घडलेल्या 'सबप्राइम' संकटाची आठवण करून देणाऱ्या आहेत. त्यातील काही खासगी क्रेडिट फंडांशी संबंधित आहेत. ज्या कंपन्यांना बँकिंग व्यवस्थेमधून कर्ज मिळत नाही, म्हणजेच बँकिंग व्यवस्थेसाठी या कंपन्या 'रिस्की' असतात, अशा कंपन्यांना हे 'खासगी क्रेडिट फंड' पैसे देतात. या खासगी क्रेडिट फंडामध्ये गुंतवणूकदारांनी पैसे गुंतवलेले असतात. हे पैसे काढून घेताना या गुंतवणूकदारांना काही निर्बंधांचा सामना करावा लागतो आहे. ब्लू आऊल, ब्लॅक रॉक, ब्लॅक स्टोन, अपोलो ही अमेरिकेतील काही खासगी क्रेडिट फंडांची उदाहरणे. पैसे काढून घेण्यावर निर्बंध लादल्याने या कंपन्यांकडे गुंतवणूकदारांनी जी रक्कम मागितली होती त्याच्या काही टक्के रक्कम मिळेल, असे या फंडांनी जाहीर केल आहे.हा विषय खरे तर खासगी क्रेडिट फंडांची संबंधित आहे. त्याचा पूर्ण बँकिंग व्यवस्थेवर व्यापक परिणाम होणार नाही, असे कुणास वाटत असेल तर ते तसे नाही. ७ ऑगस्ट २०२५ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक 'एक्झिक्युटिव्ह ऑर्डर' काढली. अमेरिकेमध्ये ४०१ज्ञ ही गुंतवणूक आहे. ती गुंतवणूक खासगी क्रेडिट फंडांना वापरता येईल, असे त्या आदेशात म्हटले होते. ४०१ज्ञ गुंतवणूक म्हणजे काय? तर आपल्याकडे पगारदार कर्मचाऱ्यांसाठी जशी भविष्यनिर्वाह निधीची व्यवस्था असते, त्याचप्रमाणे अमेरिकेमध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड असतो; त्याला ४०१ज्ञ असे म्हटले जाते. या पेन्शन फंड किंवा वेल्थ फंडमधील रक्कम खासगी क्रेडिट फंडांना वापरायला परवानगी देण्यात आली. त्यामुळे अमेरिकेतील बड्या बँकर्सनी खासगी क्रेडिट फंड सुरू केला आणि ही गुंतवणूक वापरली. त्याच्यामध्ये ब्लॅक स्टोन, ब्लॅक रॉक यांसारखी मोठी नावे आहेत. त्याचबरोबर जे. पी. मॉर्गन, मॉर्गन स्टॅन्ली हेसुद्धा आहेत. हे सगळेच अमेरिकेतील मोठे बँकर्स आहेत. त्यांनी खासगी क्रेडिट फंडामधून गुंतवणूकदारांना पैसे काढण्यासाठी निर्बंध लादले. याचा अर्थ त्यांच्याकडे आता गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी पैसे नाहीत किंवा त्यांनी ते अशा ठिकाणी गुंतवले आहेत, की ते लगेच काढून गुंतवणूकदारांना देता येत नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदार अडचणीत आले आहेत.आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक गुंतवणूकदारांनी पैसे परत मागितल्याने आम्ही ते देऊ शकत नाही, असे म्हणणे या कंपन्यांनी मांडले आहे. त्यातील ब्लू आऊल कंपनीच्या क्रेडिट फंडातून पैसे काढण्यावर पूर्णच बंदी घातलेली आहे. म्हणजे गुंतवणूकदार या क्रेडिट फंडातून पैसे काढूच शकत नाहीत. म्हणजे या फंडांकडे गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी आत्ता रोख रक्कम नाही. आणि ही गोष्ट फक्त खासगी क्रेडिट फंडापुरती मर्यादित राहत नाही, कारण त्या खासगी क्रेडिट फंडामध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड यांचे पैसे गुंतवलेले आहेत. या गोष्टीचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाल्यास त्याची व्याप्ती वाढू शकते, असे या विषयातील जाणकार सांगत आहेत. या घडामोडींचा परिणाम म्हणून, ब्लॅक रॉक, केकेआर, अपोलो ग्लोबल मॅनेजमेंट, एस मॅनेजमेंट, ब्लू आऊल कॅपिटल, टीपीजी या सर्व कंपन्यांचे शेअर पाच ते सहा टक्क्यांनी घसरले. 'फिच' या रेटिंग संस्थेच्या निरीक्षणानुसार अमेरिकेतील खासगी क्रेडिट पोर्टफोलिओचा डिफॉल्ट दर २०२५मध्ये ९.२ टक्के या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. सन २०२४मध्ये हा दर ८.१ टक्के होता. जगभरातील १.७ ते दोन ट्रिलियन डॉलर इतक्या आकाराच्या खासगी क्रेडिट बाजारावर सध्या मोठा ताण निर्माण झाला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर संपूर्ण बँकिंग व्यवस्थेला फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अमेरिकेतील वाहन उद्योगाशी संबंधित असलेल्या तीन कंपन्यांनी ऑक्टोबर महिन्यात दिवाळखोरी जाहीर केली. फर्स्ट ब्रँड्स, ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या त्या तीन कंपन्या आहेत. फर्स्ट ब्रँड्स ही कंपनी वाहन क्षेत्राला लागणारे सुटे भाग बनवते. त्यांच्यावरील कर्जाचे प्रमाण हे त्यांच्या मालमत्तेपेक्षा तीन ते पाच पटीने जास्त झाले असून आर्थिक संकटामुळे ते फेडता येणे शक्य नाही, असे कंपनीने जाहीर केले आहे. ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या कंपन्या कर्ज पुरवणाऱ्या कंपन्या आहेत. त्यांनी त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक कर्जाचे वितरण केले. या दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे या दोन्ही कंपन्यांना सध्या मोठ्या आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते आहे.या तीन कंपन्यांनी दिवाळीखोरी जाहीर केल्यानंतर ब्रिटनच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर अँड्रू बेली यांनी सन २००८मध्ये आलेल्या सबप्राइम संकटाची आठवण करून दिली. सन २००८मध्ये लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी या तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केली. त्यानंतर शेअर बाजारात प्रचंड मोठी उलथापालथ झाली. युरोपीय राष्ट्रांनादेखील फार मोठा आर्थिक धक्का बसला. फेडरल रिझर्व्हने घेतलेला 'सबप्राइम लेंडिंग'चा निर्णय घातक ठरला. सबप्राइम लेंडिंग म्हणजे कर्जासाठीच्या नियमांत शिथिलता आणणे. कर्ज घेणारे जे उत्पन्न दाखवतील तेच योग्य आहे असे गृहीत धरून बँकांनी कर्जे दिली. कर्जे देताना त्याबाबत योग्य ती शहानिशा करण्यात आली नाही. कर्ज परतफेड करण्याची ऐपत नव्हती अशा व्यक्तींनाही कर्जे मिळाली आणि पुढे बँकांची अवस्था वाईट झाली. पुढे तीन-चार वर्षे आर्थिक मंदीला सामोरे जावे लागले. त्यातून बाहेर पडायला बराच वेळ लागला. जेव्हा लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी यांनी दिवाळखोरी जाहीर केली तेव्हा इतर देशांनी, हे आर्थिक संकट किती मोठे असू शकेल, अशी चिंतायुक्त विचारणा केली होती. त्या वेळी, हे खूप मोठ्या आर्थिक व्यवस्थेचा अतिशय लहान भाग आहे, असे उत्तर अमेरिकेने दिले होते.आता वाहन क्षेत्रातल्या तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केल्यानंतर अँड्रू बेली यांनी त्या वेळच्या घटनाक्रमाची आठवण करून दिली आहे. तेव्हाही तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केल्यानंतर अमेरिकेने त्याचा व्यापक आर्थिक संकटाशी संबंध नसल्याचे दावे केले होते, याकडे ते लक्ष वेधतात. आत्ताही अमेरिकेत प्रचंड मोठ्या कर्जांची विभागणी करून त्याचे स्वतंत्र हिस्से करण्याच्या प्रक्रिया वेगात सुरू आहेत, असे अँड्रू बेली यांचे म्हणणे आहे.

# शिक्षणसंस्था संचालक डॉ.विनय पी.राऊत यांना 'एज्युकेशन आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. विनय पी. राऊत यांना डॉ. दिलीप पाटील यांच्या 'छत्रपती हायर एज्युकेशन इंटेलेक्चुअल फोरम' (उक्तएखऋ), महाराष्ट्रतर्फे प्रतिष्ठेचा 'एज्युकेशन आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार एका विशेष सोहळ्यात माजी खासदार व श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ (ट्रस्ट), मुंबईचे अध्यक्ष ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.राज्यशास्त्र विभागातील माजी प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून डॉ. राऊत यांची शैक्षणिक कारकीर्द अत्यंत यशस्वी राहिली असून, त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला आहे. विद्या विकास एज्युकेशन सोसायटीअंतर्गत कार्यरत १८ शैक्षणिक विभागांचे त्यांनी दूरदर्शी व प्रभावी व्यवस्थापन केले आहे.




आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहेत.डॉ. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयटी, बायोटेक, कला, वाणिज्य, दूरस्थ शिक्षण, रोबोटिक्स, संगीत व क्रीडा या क्षेत्रांतील कौशल्याधारित व भविष्याभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि त्यांना करिअरसाठी सक्षम बनविणे, यावर त्यांचा विशेष भर आहे.मुंबईपुरते कार्य मर्यादित न ठेवता त्यांनी ग्रामीण व आदिवासी भागातही शिक्षणाचा प्रसार केला आहे. ठाणे जिल्ह्यातील वांगणी येथे हजारो आदिवासी विद्यार्थ्यांसाठी बारावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील रेडी येथे इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापन करून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दारे खुली केली आहेत.शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे संस्थेतील अनेक मुख्याध्यापक व शिक्षकांना जिल्हा व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखालील तीन शाळांना २०२५ मध्ये 'मुख्यमंत्री - माझी शाळा, सुंदर शाळा' या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.शिक्षण प्रसार व सामाजिक उत्थानासाठी समर्पित असलेले डॉ. विनय पी. राऊत यांचे कार्य हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्यांना प्रदान करण्यात आलेला 'एज्युकेशन आयकॉन अवॉर्ड २०२६' हा त्यांच्या निस्वार्थी सेवेचा व समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा यथोचित गौरव मानला जात आहे.

# बॉस्को डिसोझा यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

व्यसन उपचार व प्रतिबंध क्षेत्रात तीन दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणारे

बॉस्को मायकल डिसोझा यांना शासनाचा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार २०२४-२०२५' सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या प्रसंगी त्यांच्या पत्नी चार्मिन बास्को डिसूझा,नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास, चिटणीस अमोल स.भा.मडामे उपस्थित होते.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मध्ये गुरुवारी झालेल्या समारंभात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले,प्रधान सचिव हर्षदीप कांबळे,सत्यपाल महाराज आदिंची भाषणे झाली. डिसोझा यांनी गेल्या ३३ वर्षांहून अधिक काळ व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्य करत हजारो व्यसनाधीन व्यक्तींना नवे जीवन दिले आहे. पुनर्वसन, जनजागृती,



प्रशिक्षण आणि संशोधन या सर्व स्तरांवर त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, देशभरात व्यसनमुक्ती केंद्रे उभारण्यामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. पोलीस, विद्यार्थी, तसेच विविध सामाजिक घटकांमध्ये ते नियमितपणे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहेत.या पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना बॉस्को मायकल डिसोझा यांनी 'नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य'च्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास आणि चिटणीस अमोल स.भा. मडामे यांचे विशेष आभार मानले. त्यांच्या सहकार्यामुळे व्यसनमुक्ती चळवळ अधिक प्रभावीपणे राबवता आली, असे त्यांनी नमूद केले.

# दिव्यातील दातीवली स्मशानभूमीत विद्युत दाहिनी बसवा-योगिता नाईक, उबाठा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरात सर्वसामान्य नागरिकांना अंत्यसंस्कारावेळी येणाऱ्या आर्थिक अडचणी लक्षात घेता दातिवली येथील स्मशानभूमीत तातडीने 'विद्युत दहन वाहिनी' कार्यान्वित करून ती मोफत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या योगिता नाईक यांनी ठाणे महानगरपालिकेच्या सहायक आयुक्तांकडे केली आहे.दिवा शहरातील दातिवली स्मशानभूमी हे शहरातील अंत्यसंस्काराचे मुख्यत्व ठिकाण असून सध्या या ठिकाणी केवळ लाकडाचा वापर करून पारंपारिक पद्धतीने दहन केले जाते. मात्र वाढत्या महागाईमुळे लाकडाच्या किमती गगनाला भिडल्या असून अंत्यसंस्कारासाठी लागणारी लाकडं विकत घेताना गरीब कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण पडत आहे.




दुःखाच्या प्रसंगी सर्वसामान्यांना हा खर्च उचलणे कठीण होत आहे तसेच त्यामुळे परिसरात वायू प्रदूषण देखील होत असल्याने सौ. योगिता नाईक यांनी ठाणे महानगरपालिकेने या ठिकाणी मोफत विद्युत दहन वाहिनी सुरू केल्यास जनतेला मोठा आर्थिक दिलासा मिळेल व हवा प्रदूषण कमी होईल यामुळे आर्थिक बचतच होणार तर लाकडाचा वापर देखील कमी होऊन वृक्षतोड सुद्धा थांबेल असे स्पष्ट केले आहे. विद्युत दहन पद्धतीने अंतिम संस्कार देखील जलद होईल असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे. दिवा शहराची वाढती लोकसंख्या संख्या पाहता प्रशासनाने तात्काळ सकारात्मक विचार करून दातिवली स्मशानभूमीत विद्युत दहन वाहिनी बसवण्याची मागणी ठाकरे शिवसेनेच्या शिवसैनिक योगिता नाईक मागणी केली आहे.

# भाजपचे ज्येष्ठ नेते आणि जिल्हा परिषदेचे मा.सदस्य एकनाथ देशोकर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

## विविध सामाजिक कार्यक्रमातून गोर गरीब जनतेला मदतीचा हात

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि रायगड जिल्हा परिषदेचे मा. सदस्य एकनाथ देशेकर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे एकनाथ देशेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले रात्री १२.३० वाजता देशेकर यांचा चिंध्रण येथील घरी आले होते. गोगावले यांचे एवढे घनिष्ठ प्रेम एकनाथ देशेकर यांच्या प्रति असल्याचे पाहायला मिळाले. वाढदिवसाला सामाजिक उपक्रमाची जोड देत, अनेक विविध सामाजिक उपक्रम देखील राबविण्यात आले.वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी निवासस्थानी सकाळ पासूनच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह एकनाथ देशेकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या नेते आणि हजारो कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.सकाळी कुटुंबीयातील सदस्यांनी केक

कापून भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ देशेकर यांचा वाढदिवस साजरा केला. दरम्यान वाढदिवसानिमित्त हजारो कार्यकर्त्यांच्या समवेत करुणेश्वर अनाथ आश्रम, कुष्ठरोग शांती आश्रम येथे वस्त्र आणि फळांचे वाटप करण्यात आले. विविध सामाजिक उपक्रम राबविले. यावेळी ७० महिलांना विमा कवच देण्यात आले. महिलाना सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविण्याचा संकल्प एकनाथ देशेकर यांनी सोडला असून लाभार्थीना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पत्नी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. राजकारणाचे डावपेच खेळण्यात एकनाथ देशेकर तरबेज असल्याने त्यांचा आवडता डावपेचाचा खेळ म्हणजे कुस्ती स्पर्धा! याचे आयोजन करण्यास ते विसरले नाहीत.

**वाढीवासाठी गरिबांसाठी विविध कार्यक्रम**

महिलाना विमा कवच, त्याच बरोबर बचत गट महिलाना आर्थिक मदत, आणि काही वस्तूंची मदत करण्यात आली. जेष्ठ नेते एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त कॅबिनेट मंत्री भरत गोगावले, पनवेल नगरपालिकेचे आदर्श नगराध्यक्ष आणि उद्योगपती जे एम म्हात्रे, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्य, महानगर पालिका नगरसेवक, पंचायत समितीचे उपसभापती भेपेंद्र पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी विविध पक्षाचे नेते यांनी देशेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. पनवेलचे कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि एकनाथ देशेकर यांची जनतेप्रती काम करण्याची असलेली अस्था पाहून शेकापचा शेकडो कार्यकर्त्यांना भाजपमध्ये प्रवेश केला.

# रायगड ही शुरांची आणि लढवय्यांची भूमी-महेंद्रशेठ घरत

## महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे रायगड प्रीमियर लिगला फोर व्हिलर

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लिगचे सोनारी येथे भव्य आयोजन करण्यात आले आहे. प्रकाशझोतातील सामन्यांसाठी मोठ्या प्रमाणात बक्षिसांची खैरात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे रायगड प्रीमियर लिगमध्ये जो मालिकावीर होईल त्याला फोर व्हिलर मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे रायगड प्रीमियर लिगला फोर व्हिलर प्रोत्साहन म्हणून बक्षीस देण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या माध्यमातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने सोनारी येथे रायगड प्रीमियर लिगचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी महेंद्रशेठ घरत म्हणाले, क्रिकेटचा मी प्रचंड चाहता आहे. भारत-पाकिस्तान सामना बघण्यासाठी मी जगाच्या कानाकोपऱ्यात जातो,



प्रत्यक्षात भारत-पाक सामना पाहणे हा परमोच्च आनंद असतो. एकप्रकारे ते चाहत्यांमध्येही युद्धच असते. घोषणाबाजी, हुल्लड, ईर्षा, आनंद या साऱ्यांचा मिलाफ भारत-पाक लढतींवेळी मी अनेक वेळा अनुभवला आहे. ग्रामीण भागात आता प्रकाशझोतातील सामन्यांचे पेव फुटले आहे. हे सामने खर्चिक असतात, पण खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून मी मदतीचा हात कायम देत आलो आहे. रायगड ही शुरांची आणि लढवय्यांची भूमी आहे. त्यामुळे रायगड प्रीमियर लिगला मंगेश वाकडीकर यांच्या विनंतीनुसार फोर व्हिलर बक्षीस म्हणून ठेवली आहे. मंगेश वाकडीकर यांस कमी वयात जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची लॉटरी लागली आहे. याचा मला मनापासून आनंद आहे. त्यामुळे त्याच्या वाटचालीस माझ्या खूप खूप शुभेच्छा! राजकारणापलीकडे मी मैत्री जपतो आणि तरुणांना नोकऱ्या देतो. अनेक तरुणांत टॅलेंट आहे. क्रिकेटमधून अनेक तरुण करियर ही खडवत आहेत.यावेळी जिल्हा परिषद सदस्य वैकुंठ पाटील, महेश कडू, रायगड ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राकेश गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत खानावकर आदी मान्यवर उपस्थित होते. रायगड प्रीमियर लीगचे आयोजनात व्यवस्थापक महेश कडू मित्र मंडळ आणि अचानक मित्र मंडळ यांनी मोलाची भूमिका निभावली आहे.

# हरडक येथील पांदण रस्ता व कॅनॉलचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगाव । प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील मौजे हरडक येथील शेतकऱ्यांना शेतीवहिवाटीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'कुकडव्याची पांदण' हा पारंपारिक रस्ता खुला करण्यासाठी आणि कॅनॉलचे काम सुरुवातीपासून शेवटपर्यंत पूर्ण करण्यासाठी आज हरडक येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार आणि पाटबंधारे विभागाला निवेदन दिले.पांदण रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांचे हालनिवेदनात नमूद केल्यानुसार, मौजे हरडक येथील पौचीमाय मंदिरापासून सुरू होणारा कुकडव्याची पांदण रस्ता गेल्या काही काळापासून पूर्णपणे बंद झाला आहे. या रस्त्यावर अनेक शेतकरी अवलंबून असून रस्ता बंद असल्याने शेतीसाठी लागणारी अवजारे, बी-बियाणे, खते, ट्रॅक्टर, बैलगाडी किंवा हार्वेस्टर नेणे अशक्य झाले आहे. ऊस, सोयाबीन, हरभरा यांसारख्या पिकांची पेरणी व काढणीच्या वेळी शेतकऱ्यांना दुसऱ्याच्या शेतातून पाय धरून जावे लागत असून प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

पाटबंधारे विभागाकडे कॅनॉलची मागणी

पांदण रस्त्यासोबतच, पाटबंधारे बांधकाम विभागालाही निवेदन देण्यात आले आहे. कॅनॉलचे काम अर्धवट असल्याने सिंचनाचा प्रश्न गंभीर झाला आहे. हा कॅनॉल सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत पूर्ण क्षमतेने दुरुस्त करून कार्यान्वित करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांचा इशारायावेळी हिंदवी स्वराज्य संघटना संस्थापक अध्यक्ष शिवाजी पाटील हरडफकर! सोसायटी चेअरमन! नागोराव खंडेराव सुर्यवंशी! व्हाईस चेअरमन व्यंकटराव पाटील सूर्यवंशी! शेतकरी बाबुराव माधवराव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली! आणि कॅनॉलचे काम पूर्ण करण्यासाठी तहसीलदार व पाटबंधारे विभागाला निवेदन दिले. या मागणीसाठी गावातील मोठ्या संख्येने शेतकरी एकवटले होते.

उपस्थित शेतकऱ्यांची नावे:
निवेदनावर खालील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत:

१. मधुकर बाबूराव सूर्यवंशी
२. व्यंकटराव पांडुरंग सूर्यवंशी
३. नागोराव खंडेराव सूर्यवंशी
४. संपत अमृतराव मोरे
५. भगवान उत्तमराव इंगळे
६. संदेश शेषराव कदम
७. नवनाथ विठ्ठलराव मोरे
८. संजय दत्तराव इंगळे
९. गजानन पुंजाराजी भराडे
१०. दिलीप संभाजी मोरे
११. पंजाब संभाजी मोरे
१२. गणेशराव नागोराव इंगळे
१३. मारोती बाबूराव इंगळे
१४. बाबाजी दत्तराव कदम
१५. ऋषिकेश अशोकराव मोरे
१६. सदानंद बाळासाहेब मोरे
१७. गजानन रामराव शिंदे
१८. सुयोग विठ्ठलजी कदम
१९. आदिनाथ भगवान इंगळे
२०. बळवंत केश्वराव सूर्यवंशी
२१. उत्तम राघोजी जाधव
२२. पांडुरंगराव ज्याबोबा सूर्यवंशी
२३. सत्येंद्र पांडुरंग सूर्यवंशी
२४. योगेश पांडुरंग सूर्यवंशी
२५. योगेश पांडुरंग सूर्यवंशी (पुनरुक्ती)
२६. आशा नागेश सूर्यवंशी
२७. अवधूत दशरथ शिंदे
२८. मधुकर बाबूराव सूर्यवंशी

यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन पारंपारिक पांदण रस्ता खुला करावा आणि कॅनॉलचे काम पूर्ण करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा पुढील आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा सूर शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे



## पाथर्डीत भोंदूगिरी करणाऱ्यांचे आता खैर नाही!

# जादूटोणा विरोधी कायद्यान्वये कडक कारवाईसाठी तहसीलदाराना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**पाथर्डी । प्रतिनिधी**



राज्यात उघडकीस येत असलेल्या भोंदूगिरी व बुवाबाजीच्या घटनांमुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली असताना, पाथर्डी तालुक्यातही अशा अनिष्ट प्रथा रोखण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. तालुक्यात जादूटोणा, चमत्कार व अध्यात्माच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांवर कडक कारवाई करावी, या मागणीसाठी आज निवासी नायब तहसीलदार मा. श्री. किशोर सानप व पाथर्डी-शेवगाव विभागाचे डीवायएसपी मा. श्री. धिरज राजगुरू यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दैवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष किंवा अध्यात्माच्या नावाखाली भोळ्या नागरिकांची आर्थिक फसवणूक, मानसिक छळ तसेच महिलांचे शोषण होत असल्याच्या गंभीर घटना समोर येत आहेत. 'अशोक खरात' प्रकरणासारख्या धक्कादायक घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासनाने सतर्क राहून तात्काळ कारवाई करावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

फलज्योतिष किंवा चमत्काराचा दावा करून लोकांची फसवणूक करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर जादूटोणा विरोधी कायद्यानुसार त्वरित गुन्हे (ऋखठ) दाखल करावेत, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी नायनाट करण्यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असा इशाराही समितीने दिला. या निवेदनावेळी अहिल्यानगर जिल्हा बुवाबाजी संघर्ष कार्यवाहक श्री. शशिकांत गायकवाड, पाथर्डी तालुका अध्यक्ष श्री. वसंतराव बोर्डे, उपाध्यक्ष राजेंद्र सातपुते, साईनाथ जगन्नाथ बोर्डे, सुभाष बन्सी गायकवाड, श्रीधर दौंडे, सिद्धार्थ वसंत बोर्डे, पंढरीनाथ कांजवणे, भीमा लक्ष्मण थोरात आणि एम.डी. ढाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भोंदूगिरीला कायद्याचा धाक निर्माण करा, असा ठाम इशारा देत प्रशासनाने तातडीने कडक पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियाना अंतर्गत'उटी ग्रामपंचायतचा पाणीपुरवठा थकीत विज बिल भरण्यात आला




**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत उटी बुद्रुक (ता. औसा) येथील पाणीपुरवठा आणि पथदिव्यांच्या थकीत वीज बिलाचा भरणा आज यशस्वीरित्या करण्यात आला.गावातील सोयी-सुविधा खंडित होऊ नयेत आणि ग्रामस्थांना उत्तम सेवा मिळावी, या उद्देशाने प्रशासनाने ही तत्परता दाखवली आहे.

यावेळी महावितरण (चडएइ) कार्यालयाचे उपकार्यकारी अधिकारी श्री. शेंडगे साहेब, संबंधित इंजिनिअर आणि लाईनमन कर्मचारी उपस्थित होते.या निर्णयामुळे आता गावाला सुरळीत पाणीपुरवठा होण्यास आणि रात्रीच्या वेळी गाव प्रकाशमान राहण्यास मोठी मदत होणार आहे. ग्रामपंचायतीच्या या जबाबदार भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रा.सुनिता अविनाश राठोड गोर बंजारा साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**
**पुसद । प्रतिनिधी**



तीर्थक्षेत्र धर्मपीठ भक्तीधाम पोहरागड या ठिकाणी दि.२५ मार्च या रोजी प्रा. सुनिता राठोड यांना गोर बंजारा साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याने केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव झाला नाही, तर संपूर्ण बंजारा समाजाच्या साहित्यिक बांधवांना एक नवीन ओळख प्राप्त झाली असून या बहुमानामुळे तिच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. सातत्यपूर्ण लेखन, समाज सेवा आणि समाज जागृतीच्या तिच्या कार्याची पोचपावती म्हणजे हा पुरस्कार मानला जातो.

त्यांनी आपल्या लेखणीतून गोर बंजारा समाजाची बोलीभाषा, रूढी परंपरा, स्त्री जीवन, आपल्या बोली भाषे मुळे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना येणारे अडथळे व सामाजिक प्रश्न यांचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. या साहित्यातून ग्रामीण जीवनातील संघर्ष, संस्कृतीचे जतन आणि बदलत्या काळातील भाषेतील आव्हाने यांचा सुरेख संगम दिसून येतो.

या सन्मान सोहळ्याचे आयोजन धर्मनेता श्री.किसन भाऊ राठोड यांनी केले.ते नेहमीच ज्या लोकांमध्ये कला गुण आहे त्यांना प्रेरित करत असतात. ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. श्री. मोतीराम राठोड यांनी भूषविले.या प्रसंगी डॉ. सुभाष राठोड,प्रा. विलास भाऊ राठोड, मा. शंकर आडे, श्री. सुभाष राठोड (से. नि. डी. वाय. एस.पी.) कु. राजश्री आडे आणि समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. मंचावर उपस्थित साहित्यिकांच्या कार्याचे कौतुक करताना, बंजारा साहित्यिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व बंजारा बांधवांचे कार्य मोलाचे असल्याचे नमूद केले. त्यांच्या या साहित्यामुळे युवा पिढीला आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवण्यात मदत होत असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. या पुरस्कारानंतर प्रा. सुनिता राठोड यांनी आपली कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून मला मार्गदर्शन करणारे डॉ. सुभाष राठोड सर, श्री. अविनाश राठोड सर, श्रीमती. रुक्मिणी पांडुरंग पवार माझे आधारस्तंभ आहे. यांच्या प्रेरणेने बंजारा समाजाची भाषा, संस्कृती, संवर्धन करून ते जतन करण्यासाठी मी सदैव कार्य करीत राहील. बंजारा भाषा म्हणजे आपली कुंजी आहे. ती हरवू देऊ नका. असे विचार त्यांनी आपल्या मनोगता मधून व्यक्त केले.

# जि.प.शाळा हरणीच्या शिरपेचात मानाचा तुरा;तीन विद्यार्थ्यांची 'एकलव्य' विद्यालयासाठी प्रथमच निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**पळसगांव(पि) । प्रतिनिधी**



चंद्रपूर जिल्हा अंतर्गत चिमूर तालुक्यातील मौजा हरणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे.सन २०२५-२६ च्या प्रवेश प्रक्रियेत शाळेतील,१) कुमारी अवनी अविनाश रणदिवे,२) कुमारी ऋतुजा दिनेश श्रीरामे,आणि कुमार प्रियांशू साईनाथ रणदिवे या तीन विद्यार्थ्यांची 'एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल' (एचठड) साठी निवड झाली आहे.

शाळेच्या इतिहासामध्ये एकाच वेळी तीन विद्यार्थ्यांची या प्रतिष्ठेच्या विद्यालयासाठी निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे.यशाची भरारी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर घेत हे यश संपादन केले आहे.

एकलव्य विद्यालयासाठी होणारी निवड ही अत्यंत कठीण मानली जाते,परंतु या विद्यार्थ्यांनी योग्य नियोजन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेला गवसणी घातली.या निवडीमुळे आता या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे माध्यमिक शिक्षण आणि सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत.

शाळेचे आणि गावाचे नाव उज्ज्वल....

या दैदिप्यमान यशाबद्दल मुख्याध्यापक,सर्व शिक्षक वृंद आणि शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे. जिल्हा परिषद शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

कौतुकाचा वर्षाव....

अवनी,ऋतुजा आणि प्रियांशू यांच्या या यशामुळे हरणी गावात आनंदाचे वातावरण असून,सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पालकांनीही आपल्या पाल्यांच्या या यशामुळे समाधान व्यक्त केले असून शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे आभार मानले आहेत.

अभिनंदनाचा वर्षाव....

जि.प.प्राथमिक शाळा,हरणीच्या ३ विद्यार्थ्यांची 'एकलव्य' विद्यालयासाठी प्रथमच निवड झाल्याने,१) अवनी अविनाश रणदिवे,२) ऋतुजा दिनेश श्रीरामे,३) प्रियांशू साईनाथ रणदिवे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर व मार्गदर्शक शिक्षकांवर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे

# सनशाईन पॅपटेक कंपनीविरोधात श्रमजीवी संघटनेचे तीव्र आंदोलन; प्रदूषणामुळे नागरिकांचा संताप उसळला

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील आबिटघर येथील सनशाईन पॅपटेक प्रा. लि. या कंपनीविरोधात प्लास्टिक कचरा जाळून मोठ्या प्रमाणात हवा व पाणी प्रदूषणाला त्रासलेल्या नागरिकांद्वारे श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली आज तीव्र आंदोलन छेडण्यात आले. कंपनीच्या गेटसमोर शेकडो नागरिकांनी ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. कंपनीकडून जाळल्या जाणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे परिसरात सतत धूर, दुर्गंधी व विषारी वायू पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. विशेषतः लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना श्वसनाचे त्रास वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

या संदर्भात आबिटघर ग्रामपंचायत तसेच स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त नागरिकांनी श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. यापूर्वी १६ मार्च रोजी तहसीलदार कार्यालय, वाडा येथे आंदोलनाबाबत पूर्वसूचना देण्यात आली होती, मात्र प्रशासनाने दखल न घेतल्याचे समोर आले.

या आंदोलनाचे नेतृत्व श्रमजीवी संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष भरत जाधव, तालुका सचिव सुरज दळवी, शहाजी मुकणे, सागर गुरोडे, शरद सवर, सरिता सवर, भाग्यश्री जाधव, विनोद पाटील, कृषी रत्न नरेश आमले यांच्यासह कार्यकर्त्यांनी केले. यावेळी संघटनेचे शेकडो सभासद सहभागी झाले होते. आंदोलकांनी प्रदूषणकारी कंपनी बंद करा, आरोग्याशी तडजोड चालणार नाही अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

दरम्यान, इतक्या मोठ्या आंदोलनानंतरही एकही जबाबदार अधिकारी घटनास्थळी न आल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. जोपर्यंत प्रदूषण थांबवून संबंधित कंपनीवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला असून या आंदोलनाकडे संपूर्ण वाडा तालुक्याचे लक्ष लागले आहे

# उमरी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण शिबीर संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**उमरी । प्रतिनिधी**

येथे दि २५ मार्च २६ रोजी दुपारी २ वाजता रोहिदास मंगल कार्यालयात भारतीय जनता पार्टी नांदेड ग्रामीण दक्षिण जिल्हा अंतर्गत ता उमरी येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षण शिबीर पंडित दिनदयाळ उपाध्याय व इतर मान्यवर नेत्यांचे दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत यांनी सत्कार केला. प्रथम सत्र मा मारोतराव कवळे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले तर नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस माणिकराव लोहगावे यांनी मार्गदर्शन केले आहे. तर दुसऱ्या सत्रात माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले आहे तर नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी मार्गदर्शन केले आहे.



सदरील प्रशिक्षण शिबीरांत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर, डॉ अमोल ढगे, बापुसाहेब पाटील कौडगावकर, इत्यादीची प्रमुख उपस्थितीत होती. या प्रशिक्षण उपक्रमांमध्ये माणिकराव लोहगावे व लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना पक्षांची विचारधारा, संघटनात्मक बांधणी, तसेच समाजाभिमुख कार्यपद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले आहे.

या निवासी प्रशिक्षणाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्यासाठी आणि केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व राज्यातील मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या जनकल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

उमरी येथे पार पडलेल्या प्रशिक्षण शिबीरांत भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या उपक्रमामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवी उर्जा व उत्साह निर्माण होऊन पक्षाच्या विचारांना अधिक बळ मिळणार आसल्यांचा विश्वास यावेळी व्यक्त केला.सदर निवासी प्रशिक्षणांचे आयोजन ग्रामीण उमरी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत व शहर अध्यक्ष बालाजी पाटील ढगे यांनी यांनी उत्तमरित्या व यशस्वी केले आहे. याबद्दल त्यांचे मान्यवरांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

यावेळी नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, शेतकरी नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर, डॉ अमोल ढगे, बापुसाहेब पाटील कौडगावकर, सौ सायली संजय कुलकर्णी नगर सेविका, गंगाधर पाटील पुय्यड, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, बालाजी माचेवाड,सौ अर्चनाताई राठोड, राणीताई पोटेवाड, प्रणिता जोशी, मायाताई दवणे, अविनाश पाटील कदम, अनुसूचित मोर्चाचे तालुकाध्यक्ष रवींद्र गायकवाड कुदळेकर, सापते पाटील चिंचाळकर, सोनु वाघमारे, मंडळातील सर्व लोकप्रतिनिधी, बुथ प्रमुख, शक्ती प्रमुख, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिक चा स्वंयघोषित भोंदुबाबा अशोक खरात याला रिपाई व बौ.पं.स.गट क्र २९ वतीने जोडोमारो आंदोलन



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) मालाड विधानसभा च्या वतीने मालाड स्टेशन येथे नाशिक चा स्वंयघोषित भविष्यतंज्ञ म्हणुन शेकडो महिलांना आपले मुत्र प्राशन करायला लावणार भोंदूबाबा अशोक खरात याचा निषेध करत त्यांच्या प्रतिमेस जोडोमारो आंदोलन मालाड विधानसभा अध्यक्ष श्री.सुनिल गमरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.हरामखोर अशोक खरात यांच्यावर तातडीने खटला चालवुन त्यास फाशीची शिक्षा झाली पाहिजे.तसेच .ह्या प्रकरणात महिला आयोग च्या माजी.अध्यक्षा रुपाली चाकणकर हिच्या सह जे जे ह्या अमानविय कृत्यास जबाबदार असतिल त्यांच्यावर ही गुन्हा दाखल करुन ,त्यानाही कडक शिक्षा जन्मठेप किंवा मरेपर्यंत फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी सरकार कडे करण्यात आली.लवकरच शाशन नाही झाले तर आंदोलन अजुन उग्र करु असे सांगण्यात आले.ह्या निषेध मोर्चात मालाड विधानसभा अध्यक्ष व बौद्धजन पंचायत गट क्र.२९चे विश्वस्त सुनिल गमरे सह रिपाई नेते प्रकाश बनसोडे, आयुष सिंग,सत्यदेव बाबु चव्हाण (वार्ड अध्यक्ष ३५),मालती कटाळे,अश्विनी गोसावी ,मिना कदम,बौ.पं.स.क्र.५९६ चे उपाध्यक्ष सुरेश कांबळे,मंगेश टोम्पे,सुर्यकांत कांबळे,मनिष कांबळे,अमित कांबळे,अजित गोधंळी,एम.मुरगेश,मनोहर पवार,पंकज जाधव,एम.मुकेश,राजेश कौंडर,ईत्यादी हजर होते.सर्व कार्यकर्त्यानी सुनिल गमरे आगे बढो हम तुम्हारे साथ है.च्या घोषणा देत निषेध मोर्चा संपवला.

## कन्हेरी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात

# भागवत कथाकार ह.भ.प महेश महाराज भांदर्गे महापुरकर यांच्या सुश्राव्य वाणीतुन संगीतमय भागवत कथेचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील कन्हेरी येथे गेल्या ३२ वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व भागवत कथा साजरा केला जातो ,कन्हेरी येथील सप्ताहात भक्तीमय वातावरणात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी होते व गावातील नवतरुण व नवयुवक सांप्रदायात यावे यासाठी सप्ताहात नामवंत किर्तनकारांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात येते , या सात दिवसीय सप्ताहात आज व्यासपीठ व गाथा पुजन करुन मोठ्या जल्लोशात सुरुवात करण्यात आली पुढील सात दिवसात काकडा.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ,भागवत कथा ,हरिपाठ हरिजागर व किर्तनाचे आयोजन केले आहे यावेळी भागवत कथाकार ह .भ .प महेश महाराज भांदरगे महापूरकर यांच्या सुश्राव्य वाणीतुन भाविकांना भागवत कथा होणार आहे ,



ह .भ .प धनराज महाराज रोंगे रिंगणीकर,ह .भ .प कुलदीप महाराज शिउरकर ,
ह .भ .प अमोल महाराज गुट्टे ,
ह .भ .प नामदेव महाराज राऊत केजकर,ह .भ. प सतीश महाराज कदम भूम,
ह.भ.प गुरुवर्य सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर
ह .भ .प श्री संदिपान महाराज सुमठाणकर सह काल्याचे किर्तन ह भ प बाळकृष्ण महाराज काळे सुगावकर यांच्या वानितुन भाविकांना ऐकण्यास मीळणार आहे ,यावेळी सरपंच पुरुषोत्तम झीरमीरे ,उपसरपंच किशोर झीरमीरे ,,गौतम बोडके ,आमोल पांचाळ ,उमेश बोडके,रमेश बोडके,धनराज झीरमीरे ,वसंत झीरमीरे ,प्रल्हाद झीरमीरे ,अशिश झीरमीरे ,पंडीत घोटाळे ,उद्धव घोटाळे ,बालाजी दळवे ,बालाजी पाटील ,कीशोर झीरमीरे ,अनिल पाटील ,बाडगीरे गुरुजी , व्यासपीठ अधिकारी दयानंद पाटील ,वसंत आळंगे,सह
जगदंब प्रतिष्ठान कन्हेरीचे नवयुवक व तरुण कार्यकर्ते ,भजनी मंडळ सह समस्थ कन्हेरी ग्रामस्थ उपस्थीत होते,

# आशेचा किरण! विधवा मातेच्या दोन मुलांसाठी 'बालसंगोपन योजने'चे दरवाजे उघडले ;युवा नेते कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या पुढाकारामुळे मिळाले आर्थिक साहाय्य

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगाव । प्रतिनिधी**

दुःखाच्या काळात कोणाच्या तरी मदतीचा हात मिळणे हे नशिबाचे काम असते. हरडफ गावातील ज्योत्स्ना कृष्णा सूर्यवंशी या विधवा माऊलीच्या आयुष्यात अशीच एक आनंदाची बातमी समोर आली आहे. आपल्या पतीच्या निधनानंतर दोन लहान मुलांचा सांभाळ करताना आर्थिक विवंचनेत असलेल्या या माऊलीला युवा नेते आणि युवा सेना मराठवाडा सचिव कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या तत्काळ पुढाकारामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

ज्योत्स्ना सूर्यवंशी यांचे पती नुकतेच काळाच्या पडद्याआड गेले. मागे आयुष्य (वय १० वर्षे) आणि अनुप (वय ८ वर्षे) ही दोन लहान मुले. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधारच हरवल्याने ज्योत्स्ना यांच्यासमोर जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. शासनाच्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजने'त त्यांनी अर्ज केला होता, परंतु काही तांत्रिक त्रुटींमुळे तो लाभ अडकला होता.

कृष्णा पाटील आष्टीकर यांचा तत्काळ पुढाकार

ही बाब गावातील कार्यकर्त्यांनी युवा नेते कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी संवेदनशीलतेने प्रकरणाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधला आणि अर्जातील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांचा पाठपुरावा अविनाश पाटील मोरे व इतर सहकाऱ्यांनी पूर्ण केला.

४२ हजारांची मदत खात्यावर जमा

या प्रयत्नांना यश आले असून, ज्योत्स्ना सूर्यवंशी यांच्या मुलांच्या खात्यात ४२ हजार रुपयांची रक्कम जमा झाली आहे. यापुढे या दोन्ही मुलांना १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत दरमहा प्रत्येकी २२५० रुपये, म्हणजेच दोघांसाठी मिळून ४५०० रुपये दरमहा मिळणार आहेत. मुलांच्या शिक्षणाचा आणि उपजीविकेचा मोठा प्रश्न या निर्णयामुळे सुटला आहे.



गरजू कुटुंबांना आवाहान

या मदतीमुळे कृतज्ञ झालेल्या ज्योत्स्ना सूर्यवंशी यांनी कृष्णा पाटील आष्टीकर यांचे आभार मानले आहेत. कृष्णा पाटील यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की, ज्या कुटुंबांतील पालकांचे छत्र हरपले आहे, अशा कुटुंबांनी शासनच्या बालसंगोपन योजनेचा लाभ नक्की घ्यावा. कोणालाही योजनेत तांत्रिक अडचण येत असल्यास त्यांनी शिवसेना संपर्क कार्यालय, हदगाव येथे अवश्य संपर्क साधावा.

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या सेवाकार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# तामसा येथे गोवा रजनीगंधा गुटखा विक्री राजरोस सुरू

## अन्न औषध प्रशासन विभागाचा कानाडोळा

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेला तामसा येथेज्ञअन्न औषध प्रशासन विभागाच्या मुखसंतीने रजनीगंधा, मुसाफिर,राज निवास गोवा हा गुटखा पुड्या राजरोसपणे विक्री आणि तस्करी सुरू असून गुटखा पुड्याच्या आहारी शालेय विद्यार्थी गुटखा खाण्याच्या आधीन जाऊन आपले आरोग्य बिघडवीत आहेत. तामसा येथील एक गुटखा किंग तस्कर आंध्र प्रदेशातून हिमायतनगर मार्गे गुटख्याच्या गाड्या आणून तामसा शहरात साठवणूक करून निवघा, हदगाव, तामसा, लोहा, उमरखेड या परिसरात तस्करी करीत असल्याचीही जनतेत चर्चा होत असून ह्या



विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि नांदेड येथील अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी या बाबीकडे लक्ष केंद्रित करून तामसा येथील गुटखा तस्करा किंग तस्करास कायद्याने वाटणीवर आणून त्यांच्या मुसक्या आवळतील काय? तामसा येथील राजरोस गुटखा तस्करीमुळे अन्न वऔषध प्रशासन विभागाची कर्तव्य निष्क्रियता चव्हाट्यावर आली असल्याचे हदगाव तालुक्यातील आणि तामसा येथील जनतेत बोलल्या जात आहे.

# महावितरणमध्ये घोटाळ्यांचा महापूर!

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

नांदेडच्या महावितरण विभागातील किनवट उपविभागात गेल्या दहा वर्षांपासून कंत्राटी कामगारांच्या जीवावर 'अर्थपूर्ण' माया जमवण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कामगारांच्या घामाची कमाई थेट अधिकारी आणि कंत्राटदारांच्या खिशात जात असल्याचा खळबळजनक आरोप करत, महाराष्ट्र राष्ट्र नवनिर्माण सेनेने या भ्रष्ट साखळीलाथेट मुंबईत जाऊन आव्हान दिले आहे. मनसेने सादर केलेल्या निवेदनानुसार, किनवटमधील कामगारांना त्यांच्या हक्काच्या पगारापासून वंचित ठेवून केवळ ८ ते १० हजार रुपये 'फोन पे 'द्वारे देऊन बोळवण केली जात आहे. उर्वरित पगार नेमका जातो कुठे? तर, हा पैसा अधीक्षक अभियंता, एचआर मॅनेजर आणि कंत्राटदारांच्या अभेद्य 'भ्रष्ट साखळीत' वाटला जात असल्याचा आरोप आहे.

विशेषकिनवटच्या कंत्राटी कामगारांच्या पिळवणुकीचे प्रकरण थेट मुंबई दरबारी

म्हणजे, कामगार किनवटमध्ये घाम गाळतात, पण त्यांचा पगार परळी, माजलगाव आणि पुण्यातल्या बँकांमध्ये 'लाटला' जात आहे. यावरून हा घोटाळा किती खोलवर पसरला आहे, याची प्रचिती येते. स्थानिक पातळीवरील उपअभियंता केंद्रे आणि कंत्राटदार यांच्यातील 'मैत्री' कामगारांसाठी काळ ठरत आहे. जुन्या आणि अनुभवी कामगारांना कोणतीही कारणे न देता घरचा रस्ता दाखवून, नवीन उमेदवारांकडून नोकरीच्या बदल्यात २० ते २५ हजार रुपयांची 'लाच' वसूल केली जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. जो कामगार प्रत्यक्ष कामावर नाही, त्याच्या नावे पगार उचलणे आणि जोराबतोय त्याला वेठीस धरणे,

असा अजब कारभार येथे सुरू आहे. स्थानिक स्तरावर वारंवार निवेदने आणि आंदोलने करूनही वरिष्ठांकडून केवळ 'आश्वासनांची मलमपट्टी' करण्यात आली. अखेर, सहनशीलतेचा अंत झाल्याने मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी थेट मुंबई गाठली आहे. महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पुराव्यासह या गैरप्रकाराचा पाढा वाचण्यात आला आहे. आता मुंबईतील महाव्यवस्थापक या 'महा-घोटाळ्याची' दखल घेऊन कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देतात, की पुन्हा एकदा कागदी घोडे नाचवले जातात, याकडे संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077